# समकालीन वर्तमानाचा धगधगता आलेख म्हणजे वर्तमानातल्या कविता

**डॉ. महेश बापुरावजी जोगी**
सेठ केसरीमल पोरवाल कला, विज्ञान
आणि वाणिज्य महाविद्यालय कामठी
मोबाईल नंबर - 9834826713
Email - Mjogi923@gmail.com

***सारांश ( एबस्ट्रॅक) :-***

*कवी राम वासेकर यांनी वर्तमानातल्या कविता या कवितासंग्रहातून संपूर्ण वर्तमान व्यवस्थेतील घडामोडीचा आपल्या शब्दाच्या माध्यमातून वास्तववादी आलेख मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या कविता मानवी जीवनाला एक वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न करताना दिसतात. स्त्री आहे सृजन यासारख्या कवितेच्या माध्यमातून ते स्त्रीभ्रूण हत्या हा विषय वेशीवर टांगण्याचा प्रयत्न करतात. तर शेतकरी आत्महत्या, भ्रष्टाचार, राजकारण, श्रमाचे महत्व, पाणी समस्या, मानवी समाजातील मूल्य व्यवस्था, बेरोजगारी, सबंध व्यवस्था उलटून पाडण्यासाठी करावी लागणारी क्रांती, अशा पद्धतीचे वेगवेगळे विषय आपल्या कवितेच्या माध्यमातून मांडताना दिसतात. त्यांनी मांडलेले वेगवेगळे विषय वर्तमान परिस्थितीत अतिशय चपखलपणे लागू पडणारे आहे असे वाटल्याशिवाय राहत नाही. मानवी जीवनाच्या दुःखाचे मूळ हे अतृप्त इच्छा आहे. हे कवी 'दुःख कशासाठी' या कवितेच्या माध्यमातून सांगू पाहतात. माणसाचं अस्तित्व हे क्षणभंगुर आहे. ही जाणीव सुद्धा कवी या ठिकाणी करून देताना दिसतो. म्हणूनच त्यांचा हा कवितासंग्रह महत्त्वाचा वाटतो.*

***की वर्ड्स*** *- स्त्रीभ्रूणहत्या,शेतकरी,पाणी,अस्मानी- सुलतानी, राजकारणी, पोशिंदा, विचक्षण, महागाई, अत्याचार,लूट,इत्यादी.*

---

वर्तमानातल्या कविता हा डॉ. राम वासेकर यांचा 2013 साली प्रकाशित झालेला कवितासंग्रह एकूण 41 कवितांचा आहे. ह्या कवितासंग्रहातून कवी राम वासेकर हे वर्तमान काळातल्या वास्तवाला आपल्या कवेत घेण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्यांनी ह्या कवितासंग्रहामध्ये 2000 ते 2013 हया कालखंडातील विदर्भातील तरुण, शेतकरी, राजकारणी, स्त्रियांवरील अत्याचार, शेतकऱ्यांची होणारी लूट, शेतकऱ्यावर ओढावलेले अस्मानी- सुलतानी संकटे, पाणी समस्या यांचा आपल्या विचक्षण अशा दृष्टीतून धांडोळा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे हा कवी वेगवेगळ्या पद्धतीने आपल्या कवितेच्या माध्यमातून आपल्यासमोर व्यक्त होताना दिसतो. तो आपल्या 'घामाचे मोल' या कवितेच्या ओळी मधून

बोलताना म्हणतो

" नको आम्हा सहावा वेतन आयोग अन महागाई भत्ता

आमच्या मालाची किंमत ठरवण्याची आम्हाला हवी सत्ता "[1]

हे कवीचे भाष्य शेतकऱ्यांच्या जीवनाची व्यथा टिपण्याचा प्रयत्न करते कारण शेतकऱ्यांच्या मालाला जर रास्त भाव मिळाला तर जगाचा पोशिंदा सुखी झाल्याशिवाय राहणार नाही आणि शेतकरी सुखी झाला तर जग सुखी झाल्याशिवाय राहणार नाही ही भावना ते व्यक्त करताना दिसतात पण त्यासाठी मात्र आम्हाला सत्तेवर यावे लागेल आणि सत्तेच्या माध्यमातून रास्त मालाची किंमत ठरवावी लागेल पण हे कवीचे स्वप्न प्रत्यक्षात साकार होताना दिसत नाही तर शेतकरी मात्र उपेक्षितच राहतो आणि नोकरदार वर्ग मात्र दिवसेंदिवस पगारवाढ करून घेऊन आपले महागाई भत्ते मात्र सरकारकडून वाढवून घेताना दिसतात हे वास्तव कवी आपल्या कवितेतून अस्वस्थपणे मांडताना दिसतो. ही वास्तव परिस्थिती कवी या मोजक्याच ओळी मधून मांडून वर्तमान परिस्थिती आपल्यासमोर प्रकट करण्याचा प्रयत्न करतो. त्यासोबतच कवी शिक्षण व्यवस्थेचे बाजारीकरण कसे होऊ पाहत आहे याविषयी बोलताना वर्तमान या कवितेत म्हणतो

" शिक्षणाच्या बाजारात कासव आणि ससे
ज्ञान क्षेत्रावरही भांडवलशाहीचे ठसे "[2]

ह्या ओळी मधून कवी वर्तमानातील भयावह परिस्थिती वाचकांसमोर मांडण्याचा प्रयत्न अतिशय चपकल अशा प्रतिमाच्या माध्यमांतून या ठिकाणी मांडू पाहतो आहे. शिक्षणाचा कॉन्व्हेट संस्कृतीतील बाजार दिवसेंदिवस कसा भरभराटीकडे जातो आहे आणि शिक्षण क्षेत्रासारख्या पवित्र व्यवस्थेवर भांडवलदार वर्ग डोळा ठेवून खऱ्या अर्थाने पैशाचा ओघ लाटतो आहे आणि दिवसेंदिवस श्रीमंत बनतो आहे ही अस्वस्थ भावना तो या कवितेच्या ओळीतून व्यक्त करतो आहे. कारण राज्यघटनेने दिलेली मोफत शिक्षणाची संधी कॉन्व्हेंट संस्कृती आपल्या पायदळी तुडवते आहे. आणि पालक वर्गाकडून भरमसाठ फीज वसूल करून त्यांचे शोषण करते आहे. ही वर्तमान परिस्थितीतील भावना तो या कवितेतून मांडू पाहतो आहे. त्यासोबतच तो दुसऱ्या आपल्या कवितेमधून मानवी वर्तन दिवसेंदिवस कसे बदलत चालले आहे याविषयी भाष्य करताना म्हणतो

" सोयीनुसार माणूस मुखवटे बदलतो
कसे सरडा ज्याप्रमाणे रंग बदलतो तसे "[3]

म्हणजे माणसाची प्रवृत्ती ही आजच्या काळात सरड्यासारखी झाली आहे कारण सरडा जसा प्रसंग किंवा परिस्थिती पाहून आपला रंग बदलतो तसाच आजचा माणूस आपले मुखवटे सतत बदलून जिकडे सत्ता तिकडे मत्ता या न्यायाने आपले तत्व सोडून जीवन जगताना ह्या कवीला दिसतो आहे. त्यामुळे

मूल्यव्यवस्था रसातळाला जात आहे ही भावना कवी या ठिकाणी व्यक्त करतो कारण थोर संतांनी,समाज सुधारकांनी मोठ्या कष्टाने निर्माण केलेली ही समाजव्यवस्था माणूस आपल्या स्वतःच्या स्वार्थासाठी रसातळाला नेतो आहे ही खंत कवी या ठिकाणी व्यक्त करतो आहे. म्हणूनच तो 'सोयीनुसार' हे विशेषण या ठिकाणी वापरताना दिसतो. राजकारणी लोकांवर भाष्य करताना कवी म्हणतो

"शेतकऱ्यांचा कैवार जो -तो घेतो कर्जमाफी,
अनुदान,पॅकेजची घोषणा देतो तरी थांबत नाही
आत्महत्येचे सत्र शेतकऱ्यांच्या आयुष्यात अंधारलेली रात्र "[4]

राजकारणी हे शेतकऱ्यांसाठी आम्ही कर्जमाफी केली अनुदान दिले पॅकेजेस दिली अशा प्रकारच्या घोषणा करून शेतकऱ्यांना भुलवण्याचा किंवा भूलथापा देण्याचा प्रयत्न नेहमी करतात. पण त्यांच्या या घोषणांनी मात्र शेतकऱ्यांच्या जीवनातील अंधार कधीच संपलेला नाही.शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे सत्र दिवसेंदिवस अतिशय दाहक पणे वाढतच चाललेले आहे ही कणव तो बोलून दाखवतो. पण राजकारण्यांना मात्र या सर्व गोष्टीचा फायदा झाल्याशिवाय राहत नाही ते या घोषणांच्या बळावर पाच वर्ष राजसत्ता उपभोगतात आणि आपणच शेतकऱ्यांचे कैवारी आहोत या अविर्भावात राहतात. तर 'नोटशाही' या कवितेमध्ये कवी वर्तमानातील राजकीय व्यवस्था कशा पद्धतीने चाललेली आहे याच्यावर भाष्य करताना आपल्याला एकंदर भविष्यच वर्तवतो आहे की काय अशा पद्धतीचा आभास झाल्याशिवाय राहत नाही तो म्हणतो

" ही कसली लोकशाही दिसते मला ठोकशाही
यातून पुढे आमदार खासदार मंत्री
अन पंतप्रधान सुद्धा नोटशाही वर चालणार आहे, "[5]

अशा पद्धतीचे वर्तमान व्यक्त करून कवीने व्यक्त केलेले वर्तमान भविष्यात येऊ पाहते आहे की काय असे चित्र तयार झाले आहे कारण भारतीय राजकारण एका वेगळ्या परिप्रेक्ष्यातून जाताना आपणा सर्वांना या ठिकाणी दिसते आहे आणि कवीचे हे म्हणणे वास्तवात आले आहे असा आभास निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. माणसाच्या जीवनामध्ये पैशाचे जे महत्त्व आहे ते किती भयंकर वाढलेले आहे ते या ठिकाणी कवी बोलून दाखवताना आपल्याला दिसतो आणि या पैशासाठीच माणूस भ्रष्टाचाराच्या विळख्यात या ठिकाणी स्वतःला गुंतवून घेत आहे हे सुद्धा कवी या ठिकाणी बोलून दाखवतो.त्यासोबतच कवी शेतकऱ्यांची लूट सरकारी यंत्रणेतील अधिकारी कसे करतात याविषयी बोलताना म्हणतो

"अस्मानी सुलतानी संकटांनी तुला हेरलं
मातीत या लोकांनी बेईमानी पेरलं उगवू लागली
बेशरमाची फुले सर्व यंत्रणेंनी लुटलं तुले "[6]

शेतकऱ्यावर सर्वच यंत्रणा कशा तुटून पडतात आणि मग शेतकरी कसा हवालदिल होतो हे वास्तववादी चित्र या ओळीच्या माध्यमातून कवी मांडताना दिसतो. कारण आज जर शेतकऱ्याचे चित्र बघितले तर शेतकऱ्यांचा माल काढणीवर येतो तेव्हा अस्मान म्हणजे आभाळ आपलं छत्र त्याच्या मालावर सोडतो म्हणजे जेव्हा गरज पाण्याची असते तेव्हा पाणी येत नाही आणि जेव्हा गरज पाण्याची राहत नाही तेव्हा मात्र तो मुसळधारपणे कोसळतो याने शेतकरी पूर्णपणे उध्वस्त होतो आणि उरलं सूरलं राहिलेलं पीक आहे ते सरकार योग्य भाव न देता दलालांच्या माध्यमातून लुबाडत असतो म्हणून कवी म्हणतो ह्या मातीतच आता बेईमानी निर्माण झाली आहे की काय? असा प्रश्न उपस्थित करताना दिसतो. या सरकारी नोकरदारांना किंवा दलालांना शेतकरी जगला काय किंवा मेला काय याच्याशी काही देणंघेणं नसतं तर ते बेशरमाच्या फुलासारखे विषारी होऊन शेतकऱ्यांना सतत नाडण्याचा प्रयत्न करतात. इतकी ह्या नोकरदार वर्गांची आणि दलालांची संवेदनशीलता बधिर झाली आहे.असे कवीला वाटते. कवी पाण्याविषयी आपली भावना व्यक्त करताना म्हणतो भविष्यात जर आपल्याला पाणी मिळाले नाही तर आपल्याला पाण्याच्या थेंबा थेंबासाठी तडफडावे लागणार आहे कारण ह्या पाण्यावरून राजकारण्यांनी भक्कम भ्रष्टाचार माजवीला आहे आणि सिंचनाचा जो महत्त्वाचा पैसा तो खऱ्या अर्थाने जनतेच्या कल्याणासाठी लावायला पाहिजे तो आपल्या खिशात घालतात आणि म्हणतात

"पैसा... पैसा... पैसा... माणूस
ऐसा... कैसा... माणुसकी
विसरून बनला हैवान जैसा"[7]

म्हणजे आजच्या काळात पाण्यापेक्षाही पैसा हा मोठा झाला आहे आणि हा पैशासाठी माणूस आपलं माणूसपण विसरून हैवानासारखा बनला आहे आणि माणुसकी विसरून सैतान झाला आहे. ही भावना कवी आपल्या 'पाणी' या कवितेच्या माध्यमातून मांडताना दिसतो. त्याचप्रमाणे कवी स्त्रीत्वाच्या सामर्थ्याविषयी बोलताना सुद्धा स्त्री भ्रूणहत्या ही किती भयंकर आहे हे सांगताना म्हणतो

" उमळणाऱ्या कळ्यांना उमलू द्या
फुलणाऱ्या फुलासोबत बागळू द्या
सावित्री, जिजाऊ प्रमाणे
प्रसवू द्या कर्तृत्वाच्या दिशा
कल्पना, सुनीता ही आमची आशा" [8]

या कवितेमधून कवी स्त्रियांचा महिमा किंवा स्त्रियांचे सामर्थ्य आपल्यासमोर बोलून दाखवताना राष्ट्रमाता जिजाऊ सोबतच स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार मिळवून देणाऱ्या सावित्रीबाई फुले यांचे सुद्धा कर्तृत्व आपल्यासमोर सादर करून वर्तमान युगातील कल्पना चावला आणि सुनीता विल्यम यांचे कर्तृत्व सुद्धा आपल्यासमोर मांडण्याचा प्रयत्न या कवितेच्या माध्यमातून करतात. म्हणजे एक प्रकारे स्त्री ही समाजाला

किती प्रगतीपथावर घेऊन जाऊ शकते हाच महत्त्वाचा संदेश या ठिकाणी कवी आपल्या या कवितेच्या माध्यमातून वाचकांना किंवा रसिकांना देऊ पाहतो आहे.

"दुःख कशासाठी" या कवितेच्या माध्यमातून कवी मानवी जीवनातील चिरंतन शाश्वतता आपल्यासमोर प्रकट करण्याचा प्रयत्न करताना दिसतो. संत, महात्माने सुद्धा दुःखाचे मूळ हे माणसाचं मन असलेलं या ठिकाणी सांगितलेलं आहे.कारण माणसाच्या जीवनामध्ये सुखाचे काही मोजके क्षण येत असतात आणि दुःख हे पर्वताएवढे मानवी जीवनाला व्यापून टाकत असलेले संत तुकारामांनी सुद्धा आपल्या अभंगातून सांगितलेले आहे. तरी परंतु माणसांचा मोह अजून तरी सुटलेला नाही. त्याला वाटते सबंध विश्व आपण आपल्या कवेत घ्यावे आणि या जगावर आपले अधिराज्य गाजवावे. ही मानवाची भावना कधी पूर्ण झालेली आपल्याला दिसत नाही. सिकंदरासारखा पराक्रमी राजा सुद्धा ह्या नियतीपुढे नतमस्तक होताना दिसतो. त्याला जगावर आपले अधिराज्य गाजवता आले नाही. तुम्ही आम्ही मानवाने विश्वावर अधिराज्य गाजवण्याचा प्रयत्न का म्हणून करावा असा प्रश्न कवी या ठिकाणी विचारताना म्हणतो,

" हे मानवा
तू ज्या दिवशी जन्मलास
त्या दिवशी तुझ्याकडे नव्हते काही
जे तू मिळवलेस
ते येथूनच.... "[9]

असा प्रश्न करून कवी आपल्याला एक प्रकारे अंतर्मुख करण्याचा प्रयत्न करताना दिसतो. आणि जे काही करायचे आहे ते या जन्मातच करून घ्यावयास पाहिजे. अन्यथा शोक करण्यात काहीच अर्थ नाही. असा सबुरीचा सल्लाही देताना दिसतो. कारण मनुष्य मृत्यू पावल्यानंतर आपल्या सोबत कुठलीच गोष्ट घेऊन जाताना दिसत नाही. तर तो एकटाच सर्व काय सोडून जातो. अशा पद्धतीची एक आध्यात्मिक जाणीव सुद्धा कवी या ओळीमधून सांगून जातो. हे या कवितेचे मोठेपण असलेले दिसते. भगवान बुद्धाचा दुःखाचा विचार सुद्धा या ओळीतून कवी नकळतपणे सांगून जातो.

अशाप्रकारे कवी राम वासेकर यांची कविता अस्वस्थ वर्तमानाला उजागर करताना दिसते तर दुसरीकडे असत्य, बेइमानी,भ्रष्टाचार या गोष्टीवर नांगर फिरवून मानवतेशी नाते जोडताना दिसते. स्त्रियांना आपण समाजामध्ये मानसन्मान दिला पाहिजे आणि स्त्रीभ्रूण हत्या रोखल्या पाहिजे. हे सुद्धा कवी याच ठिकाणी सांगतो. सोबतच शेतकऱ्यांच्या आयुष्यातील अंधकार नाहीसा झाला पाहिजे आणि त्यांच्या आयुष्यात प्रकाशाची ज्योत प्रज्वलित झाली पाहिजे यासाठी आपले शब्द वेचताना दिसते.

**संदर्भ :-**


- वर्तमानातल्या कविता-कवी राम वासेकर, राघव पब्लिशर्स अँड डिस्ट्रीब्यूटर्स, नागपूर,2013, पृ.34.
- ऊनि. पृ.1.
- ऊनि. पृ.1
- ऊनि. पृ.33
- ऊनि. पृ..12
- ऊनि. पृ.32
- ऊनि. पृ.40
- ऊनि. पृ.22
- ऊनि. पृ.15